नि.दि.दा.क्र. ४८/२०११
सुनिल वि. गणेश
**नि.क्र. ११०**
प्रतिवादी क्र.०३ ची साक्ष

**<u>प्रतिवादी तर्फे साक्षीदाराचा सरतपास विधीज्ञ श्री.एस.पी.प्रसाद यांचे मार्फत शपथेवर सुरुः–</u>**

**०१.** मी पुराव्याचा प्रतिज्ञालेख दाखल केला असुन त्यातील मजकुर माझ्या सांगण्याप्रमाणे लिहण्यात आला आहे. सदर मजकुर खरा व बरोबर असुन त्यावर माझी सही आहे. आता मला अभिलेखावरील माझे आजोबा रामचंद्र नथ्थुजी गाढवे यांनी माझ्या हक्कात लिहुन ठेवलेल्या मृत्युपत्राची मुळ प्रत दाखविण्यात आली. ती तीच आहे. तिला यापूर्वी आर्टिकल–अ देण्यात आले आहे. सदर मृत्युपत्रावर उरकुडा मारोती धांडे व गोविंदा बाभरे हे साक्षीदार होते. त्या दोघांचाही मृत्यु झाला आहे.

**<u>सरतपास संपला.</u>**

**<u>प्रतिवादी क्र.१,३,४ व ५ यांचे तर्फे उलट तपास विधीज्ञ श्री.आर.डी.किंदर्ले यांचे मार्फत सुरुः–</u>**

**०२.** माझी जन्म तारीख १६.०६.१९९८ आहे. माझी आजी आजोबा हे एकत्र कुटुंबात राहत होते. हे म्हणणे खरे आहे की, ते सर्वजण शेती करत होते. हे म्हणणे खरे नाही की, माझे आजोबा रामचंद्र यांची वडीलोपार्जीत जमीन होती. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या आजोबांनी मौजे चनोडा येथील शेत जमीन वडीलोपार्जीत शेतजमीनीच्या उत्पन्नातून खरेदी केली होती. हे म्हणणे खरे नाही की, मौजे चनोडा व आकोली येथील शेत जमीनीमध्ये वादी व प्रतिवादी क्र.०१ ते ०५ यांचा हिस्सा आहे. माझे आजोबा रामचंद्र हे दुध व्यवसाय करत होते, दुसऱ्याच्या शेतामध्ये मजुरी करत होते व बैलजोडीने दुसऱ्याचे शेत भाड्याने नांगरुन देत होते व त्यामधुन त्यांना कमाई होती याबाबत मी दस्त दाखल केले नाही. माझे आजोबा रामचंद्र मयत झाले त्यावेळी मी सहा वर्षाचा होतो. हे म्हणणे खरे नाही की, माझे आजोबा यांनी माझ्या हक्कात दिनांक ०९.०७.२००१ रोजी कोणतेही मृत्युपत्र करुन दिले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, वादी व प्रतिवादी क्र.०१ ते ०५ यांचा हिस्सा डावलण्यासाठी माझ्या

वडीलांनी खोटे मृत्युपत्र तयार केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, मौजे चनोडा येथील शेती माझ्या आजोबांनी स्वतंत्र उत्पन्नातून खरेदी केल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, वादी व प्रतिवादी क्र.०१ ते ०५ यांचा हिस्सा डावलण्यासाठी मी खोटी साक्ष देत आहे.

**<u>वादी यांचे तर्फे उलट तपास विधीज्ञ श्री. एस.एस.नाकाडे यांचे मार्फत सुरुः–</u>**

०३. मला माझ्या वडीलांची जन्मतारीख माहित नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या वडीलांचा जन्म सन १९६६ मध्ये झाला होता. हे म्हणणे खरे आहे की, मौजे आकोली येथील वडीलोपार्जीत शेतीचे चार गट क्रमांक आहेत. हे म्हणणे खरे आहे की, सदर मिळकतीला माझे वडील व मोठे वडील (काकाचे) नाव आहे. हे म्हणणे खरे आहे की, मौजे आकोली येथील शेतजमीन माझे वडील व मोठे वडील हे वेगवेगळे वहिती करतात. हे म्हणणे खरे आहे की, त्यापैकी शेत जमीन गट क्र.२४५, ३१२ व ३४४ याला नागनदीचे पाणी जवळ आहे व तेथे मोटारपंप बसवलेला आहे. हे म्हणणे खरे आहे की, गट क्र.३१० ही जमीन धानाची बांधी आहे. हे म्हणणे खरे आहे की, गट क्र.२४५, ३१२ व ३४४ मध्ये खरीप व रब्बी पिके घेतली जातात. हे म्हणणे खरे आहे की, माझे आजोबा नमुद शेतीवर कर्ज घेत होते. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या आजोबांना सदर शेतीतील उत्पन्नाशिवाय इतर उत्पन्न नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, मौजे चनोडा येथील शेतजमीन मौजे आकोली येथील शेत जमीनीच्या उत्पन्नातुन विकत घेतलेली आहे.

०४. माझ्या आजोबाची खाण्या पिण्याची व औषधपाण्याची सोय माझे वडील करत होते त्यामुळे त्यांनी माझ्या नावे मृत्युपत्र करुन ठेवले. माझ्या आजोबाने करुन दिलेले मृत्युपत्र मी वाचले आहे. सदर मृत्युपत्रात, माझ्या आजोबाने माझ्या नावे मृत्युपत्र का केले याचे कारण लिहिले नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या आजोबाने माझ्या नावाने कोणतेही मृत्युपत्र स्वमर्जीने लिहुन ठवले नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी माझ्या वडीलांच्या सांगण्यानुसार न्यायालयात साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, चनोडा येथील शेतीमध्ये माझ्या आजोबाच्या मृत्युपश्चात वादी व प्रतिवादी क्र.०१ ते ०५ यांचा कायदेशीर हिस्सा आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्यांचा हिस्सा डावलण्यासाठी खोट्या कागदपत्राच्या आधारे मी

खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या आजोबाने माझ्या हक्कात कोणतेही मृत्युपत्र करुन ठेवले नाही.

**उलटतपास संपला**

**फेर तपासणी नाही.**

श्रवणोत्तर स्विकृत,

स्वाक्षरी/-

(पी. के. मुटकुळे)

दिवाणी न्यायाधीश क. स्तर,

कुही, जि. नागपूर.

दि. १५.११.२०२५.

नि.दि.दा.क्र. ४८/२०११

सुनिल वि. गणेश

**नि.क्र. ५९**

प्रतिवादी क्र.२ ची साक्ष

**<u>प्रतिवादी क्र.१,३,४ व ५ यांचे तर्फे उलट तपास विधीज्ञ श्री.आर.डी.किंदर्ले यांचे मार्फत सुरुः–</u>**

हे म्हणणे खरे आहे की, माझे आई–वडील, भाऊ–बहिणी असे एकत्र कुटुंबात राहत होतो. हे म्हणणे खरे आहे की, ते सर्वजण शेतीचे काम करीत होते. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या वडीलांची वडीलोपार्जीत शेती होती. हे म्हणणे खरे नाही की, मौजे चणोडा येथील शेती ही वडीलोपार्जीत शेतीच्या उत्पन्नातुन खरेदी केली होती. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे सदर शेतीमध्ये वादी व प्रतिवादी क्र.१ ते ५ यांचा हिस्सा आहे. सदर जमीन ही माझ्या वडीलाने स्वकष्टार्जीत कमाईतुन खरेदी केल्याबाबत पुरावा दाखल केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, गणेश यांचे वारस व प्रतिवादी क्र.४ व ५ यांचा सुध्दा चणोडा येथील शेतीमध्ये हिस्सा आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या वडीलांची फसवणुक करुन प्रविादी क्र.१,४ व ५ यांचा हिस्सा डावलण्यासाठी माझा मुलगा प्रतिवादी क्र.६ याच्या लाभात खोटे मृत्युपत्र करुन घेतले आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटे दस्ताऐवज दाखल केले व आज रोजी खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या वडीलाने कोणतेही शेती स्वकषटार्जीत कमाईतुन खरेदी केली नव्हती.

**<u>वादी यांचे तर्फे उलट तपास विधीज्ञ श्री. एस.एस.नाकाडे यांचे मार्फत सुरुः–</u>**

माझा जन्म कोणत्या वर्षीचा आहे हे मला माहित नाही. हे म्हणणे खरे आहे की, चणोडा येथील शेती माझ्या जन्मापूर्वीची आहे. हे म्हणणे खरे आहे की, मौजे आकोली येथे माझ्या वडीलांचे ४ वडीलोपार्जीत गट नंबर होते. हे म्हणणे खरे आहे की, सदर शेतीला आम्ही तीन भाऊ व आईचे नाव आहे. हे म्हणणे खरे आहे की, आकोली येथील जमीन आम्ही तिघे भाऊ वेगवेगळी वहीती करतो. हे म्हणणे खरे आहे की, गट क्र.२४५, ३१२ व ३४४ ला लागुन नदी आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदर जमिनीत रबी व खरीब पिके घेतले जाते. गट क्र.३१० मध्ये धानाचे पिक घेतले जाते. हे म्हणणे खरे आहे की, त्यानंतर त्यामध्ये गहु घेतले जाते. हे म्हणणे खरे आहे की, गट क्र.३४४ मध्ये मोटार पंप बसविला आहे. हे

मला माहित नाही की, त्यासाठी माझ्या वडीलाने बँकेतुन कर्ज घेतले होते किंवा कसे. हे म्हणणे खरे आहे की, गट क्र.३१० व ३१२ ही जमीन मी व माझ्या वडीलाने कर्जासाठी गहाण ठेवली होती. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या वडीलाने सही करुन कर्जासाठी अर्ज केला होता. हे म्हणणे खरे नाही की, वडील वारल्यानंतर आम्ही तिघा भावांनी आकोली येथील शेत जमीन वाटणी करुन घेतली आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदर जमीन वहिती करण्यापूर्ती वाटुन घेतली आहे. आमचे ७/१२ उतारे वेगवेगळे झाले नाही.

हक्कसोड लेख हा नोंदणीकृत होता. हे मला माहित नाही की, माझ्या वडीलांना आम्ही तिन मुले व दोन मुली असतांना त्यांनी नातु आदित्य प्रतिवादी क्र.६ याच्या लाभात मृत्युपत्र का करुन दिले याचे कारण मृत्युपत्रात नमुद केले होते किंवा कसे. हे मला माहित नाही की, माझ्या वडीलाने आदित्य प्रतिवादी क्र.६ याच्या लाभात मृत्युपत्र करुन ठेवले होते किंवा कसे. हे म्हणणे खरे नाही की, चणोडा येथील शेती माझ्या मुलाला मिळावी याकरीता मी खोटे शपथपत्र दिले आहे व मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझे वडील दुसऱ्याची शेती करत होते व दुधाचा व्यवसाय करत होते हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, चणोडा येथील शेतीमध्ये वादी, माझे भाऊ व बहिणी यांचा हिस्सा आहे. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक ०९.०७.२००१ रोजी मृत्युपत्र लिहुन ठेवले होते हे मी खोटे सांगत आहे.

माझे वडील सन २००४ मध्ये मयत झाले आहे. दावा दाखल करण्यापूर्वी वादीने मला नोटीस पाठविली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, वादीने मागणी केल्याप्रमाणे त्याला हिस्सा न दिल्यामुळे त्यास दावा दाखल करणे भाग पडले. हे म्हणणे खरे नाही की, आज रोजी न्यायालयात खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास संपला**

**फेर तपासणी नाही.**

श्रवणोत्तर स्विकृत,

स्वाक्षरी/-

(पी. के. मुटकुळे)

दि. १९.०८.२०२५. दिवाणी न्यायाधीश क. स्तर, कुही.